दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५३ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.२० ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### मच्छीमारांना धोक्याची सूचना; मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये

## २२ ऑगस्ट दरम्यान वादळी वाऱ्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसाचा जोर मंगळवारी ही कायम असून, समुद्र खवळलेला आहे. त्यातच समुद्रातील वाऱ्याचा वेग प्रती ताशी ४५ ते ५० किमी राहणार असून, तो प्रती ताशी ६५ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे राज्यातील मच्छीमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, अशा सूचना मत्स्यव्यवसाय विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

समुद्र खवळलेला आहे. या कालावधीत मच्छिमारांनी सुरक्षेच्या कारणास्तव समुद्रात जावू नये, अशी सूचना मत्स्यव्यवसाय विभागाकडून मच्छीमारांना करण्यात आली आहे. या कालावधीत वित्त व जीवितहानी होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेता यंत्रणांनी अधिक अलर्ट रहावे : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**




भारतीय हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला असून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्या-तील दरडप्रवण अन पूरप्रवण गावांवर जिल्हा प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन प्रशासनाच्या तयारीचा, उपाययोजनांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील नदयाची पातळी इशारास्तरापर्यंत आहे. या नद्यांजवळच्या गावातील प्रशास-नाने घेतलेली खबरदारी, पर्यायी व्यवस्था, यंत्रणेची सुसज्जता याची माहिती घेतली. या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील पाऊस, संभाव्य अतिवृष्टी, पूरस्थिती आणि दरड कोसळण्याच्या घटना रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, जिल्हा प्रशासन कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार आहे. तहसीलदारांना आवश्यक त्या साधन, सुविधा सज्ज असतील याची खात्री करण्यास सांगितले आहे. आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याची कार्यवाही तत्काळ करावी. तातडीने मदत व बचाव कार्य यासंबंधी यंत्रणांनी कार्यक्षमतेने काम करावे पाटबंधारे, आरोग्य, महावितरण, बांधकाम विभाग, बंदर विभाग आदी महत्त्वाच्या विभागांना त्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.



सर्व शासकीय विभागप्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या सूचनेन-ुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोड' वर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी दिल्या.


जिल्ह्याला देण्यात आलेल्या रेड अलर्ट च्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

## गणेशभक्तांसाठी यंदा रेल्वेच्या ३६७ जादा फेऱ्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू. या उत्सवासाठी कोकणात तसेच राज्यभरात इतरत्र जाण्यासाठी गणेशभक्तांना प्रवास करावा लागतो. या प्रवासासाठी रेल्वेचा आधार महत्वाचा ठरतो. यासाठी यंदा भारतीय रेल्वेने दरवर्षी पेक्षा यंदा ३६७ जादा फेऱ्यांसाठी रेल्वेगाड्या सोडण्याची नियोजन केल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती देतानाच, राज्यातील तमाम गणेशभक्तांच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहे. आगामी गणेशोत्सवाच्या नियोजनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने रेल्वे मंत्री आणि भारतीय रेल्वेला गणेशभक्तांच्या सुविधेसाठी जादा गाड्या सोडण्याची मागणी केली होती. या मागणीला प्रतिसाद म्हणून केंद्रीय रेल्वे मंत्री कोकणात तसेच अन्यत्र जाणाऱ्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी दरवर्षी पेक्षा जादाच्या ३६७ फेऱ्यांचे नियोजन केले जाईल. मुंबईत राहणारे कोकणवासी गणेशभक्त गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने मुळगावी कोकणात जातात. तसेच राज्याच्या अन्यभागातील नागरिक देखील या सणासाठी प्रवास करतात. या सगळ्यांची या जादाच्या फेऱ्यांमुळे सोय होणार आहे. राज्यातील गणेशभक्तांसाठी हा मोठा दिलासा आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.



## गाढी नदीला पूर, मुसळधार पावसाचा फटका



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या तीन ते चार दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेलच्या गाढी नदीला मोठा पूर आला आहे. चिपळे येथील पुलाखालून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. गाढी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आलेले दिसत आहे. तसेच नांदगाव येथील पुलावरून पाणी गेले आहे.

गेल्या तीन ते चार दिवसांपासून पनवेल परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे. एकूण पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. पनवेल परिसरातील गाढी नदी दुथडी भरून वाहत आहे. शक्य असल्यास नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात येत आहे. गाढी नदीला महापूर आल्याने चिपळे येथील नदीला महापूर आला आहे. माथेरानच्या डोंगरालगत जास्त पाऊस पडत असल्याने ते पाणी गाढेश्वर धरणात येते आणि धरणातून ते पाणी गाढी नदीतून थेट खाडीला जाऊन मिळते. हीच गाढी नदी गेल्या काही तासांपासून दुधडी भरून वाहत आहे. मुसळधार पाऊस कोसळत असल्याने नद्यांना पूर आलेला आहे. प्रशासनाकडून सावधानतेचा इशारा दिलेला नसला तरी देखील नागरिकांनी काम नसेल तर घराबाहेर पडू नये.

नांदगाव येथील रस्ता कर्नावती नदीवरील पूल हा पाण्या खाली गेला आहे. सतत पाडणाऱ्या पावसामुळे दोन दिवस हा रस्ता येण्या जाण्या साठी बंद आहे. गेले दहा वर्ष पंचायत समिती पनवेल आणि रायगड जिल्ह्य परिषद कडे नवीन पूलाची मागणी केली आहे. मात्र या कडे दुर्लक्ष केलं जात आहे. प्रशासन बहुदा जीवित हानी होण्याची वाट पाहत असावा असा आरोप नागरिक करत आहेत.

## माथेरान घाटात महाकाय दगड कोसळला ; पर्यटकांचा थरकाप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान घाट पुन्हा एकदा धोक्याच्या छायेत आला. सलग मुसळधार पावसामुळे आज दुपारी महाकाय दगड डोंगरावरून निखळून थेट रस्त्यावर कोसळला. सुदैवाने त्यावेळी रस्त्यावर कोणतेही वाहन किंवा पर्यटक नसल्याने मोठा अनर्थ टळला. पण हा दगड जर पर्यटकांची गर्दी किंवा वाहने अडकलेली असताना कोसळला असता तर भीषण दुर्घटना घडली असती, असा सवाल ग्रामस्थ करत आहेत.

ज्या ठिकाणी हा दगड खाली आला त्याच परिसरात शासनाने पूर्वीच सुरक्षा जाळी बसवली आहे. तरीदेखील एवढा मोठा दगड रस्त्यावर कोसळल्याने या सुरक्षात्मक कामावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून माथेरान डोंगरपट्ट्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे माती ओली झाल्याने डोंगर सैल होऊन दगड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. केवळ आठवडाभरापूर्वीच जुमापट्टी परिसरात एक दगड पर्यटकांच्या काही अंतरावर पडला होता. यातच आज घाटातील पुन्हा वॉटर पाईप रेल्वे स्थानका जवळील वरच्या परिसरात महाकाय दगड कोसळल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात माथेरानमध्ये निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक गर्दी करतात आ इ दोन दिवसांपूर्वी माथेरान घाटात प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याचे देखील चित्र होते परंतु डोंगरावरून कोसळणाऱ्या दगडांच्या घटनांनी पर्यटक भयभीत झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी सरळ प्रश्न उपस्थित करीत उद्या एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? म्हणून प्रश्न उभा केला. ग्रामस्थांचे मत आहे की,आजही काही डोंगर परिसरात धोकादायक दगड हे वरून खाली पडण्याच्या स्थितीत आहेत त्यामुळे प्रशासनाने तात्काळ जोखमीच्या ठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अन्यथा पर्यटन हंगामात गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.



## सलग दुसऱ्या दिवशी रोह्यात पूर

**दै.रायगड नगरी । रोहा**

रायगड यांसह रोहा तालुक्यात सलग चार दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. रविवार सोमवार नंतर आज मंगळवारी पहाटे पासून वादळी वाऱ्यासहित पडणाऱ्या धुवांधर पावसाने अक्षरशः थैमान घातले आहे. या मुसळधार पावसामुळे येथील कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे.

रोहा अष्टमीला जोडणाऱ्या जुन्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने रोहा नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला. तसेच या पुलावरून वाहतूक बंद करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

पुढील काही तास अतिवृष्टीचा प्रशासनाने इशारा देत सोमवारी दुपारनंतर तालुक्यातील अनेक शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली होती. तर आज मंगळवारी अतिवृष्टीच्या कारणाने कालच सुट्टी जाहीर करण्यात आली.

रोहा शहरात ग्रामीण भागातही मुसळ-धार पावसाने कहर केला. नद्या, ओहोळ, नाल्यांना सलग दुसऱ्या दिवशी पूर आल्याने साऱ्यांची एकच धावपळ उडाली आहे. अनेक ग्रामीण हद्दीत जंगल भाग व कालव्यातून येणाऱ्या पाण्याचा फटका बसला आहे. रायगड जिल्ह्याला हवामान खात्याकडून रेड अलर्ट देण्यात आला असून मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत केले आहे. रोहा शहारासहित नागोठणे, कोलाड, सुतारवाडी, धाटाव, चणेरा, भालगाव, घोसाळे तालुक्यातील इत्यादी भागात पावसाने थैमान घातल्याने या ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे.



### अतिवृष्टीच्या आपत्तीत मदतीला, आपली पनवेल महानगरपालिका ; अतिवृष्टी बाधितांसाठी दिलासा

# चांगल्या सोयीसुविधा पुरवण्याचे निर्देश : आयुक्त मंगेश चितळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन दिवसापासून अतिवृष्टी होत आहे. २० ऑगस्ट रोजी देखील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट असून मुसळधार पावसाचा इशारा आहे. अतिवृष्टीच्या काळात पनवेल महानगरपालिका हद्दीतील सुमारे ४०० बाधितांना चार तात्पुरत्या निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले आहे. त्यांना चांगल्या सोयी सुविधा पुरवाव्यात असे स्पष्ट आदेश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिले आहेत.



अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. याबरोबरच आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत पालिकेच्या कोळीवाडा शाळेमध्ये १८७, उर्दू शाळेमध्ये १३५ , क्रिडा संकुल येथे ६० नागरिकांना व बुध्द विहार नवीन पनवेल येथे ६०नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.या नागरिकांना वेळोवेळी चहापाणी, जेवण व चादर देण्याची सोय पालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त तसेच सर्व संबंधित उपायुक्त,कामोठे प्रभाग अधिक्षक,दशरथ भंडारी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य निरीक्षक अरुण कांबळे हे स्थलांतरित ठिकाणी सातत्याने भेट देत असून, नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेत आहेत.

### पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रयत्न

जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या व परिस्थितीची पहाणी करण्यासाठीच्या सूचना दिल्या आहेत.तसेच सखल भागातील पाणी काढण्याच्या दृष्टीने जागोजागी जेटिंग गाडी मार्फत व जेसीबी मार्फत गटारीतील अडकलेला कचरा साफ करून चोकअप काढून घेण्यात येत असून व पाण्याचा निचरा करण्यासाठी कर्मचारी उपाय योजना करीत आहे. कळंबोली सर्कल, खारघर गावठाण तसेच पनवेल शहरातील, कामोठे, कळंबोली परिसरातील पाण्याचा निचरा करण्यासाठी पालिका यंत्रणा सज्ज आहे.



### नागरिकांनी काळजी घ्यावी

नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये.मुसळधार पाऊसात नागरिकांनी धोकादायक इमारतीमध्ये आसरा घेऊ नये. तसेच झाडे, होर्डिंग्ज खाली उभारू नये. असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्रत्यक्ष पाहणी

दरम्यान आज रोजी सकाळी १०.३० वाजता आयुक्त तसेच अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी कळंबोली होल्डिंग पाँड येथील महानगरपालिकेतर्फे लावण्यात आलेल्या पाणी उपसा पंपांची पाहणी केली. पाणी निचरा यंत्रणा सुरळीतपणे कार्यरत असल्याची खात्री त्यांनी करून घेतली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ती दक्षता सातत्याने ठेवण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या.कळंबोली मध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोली मधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरु ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच पनवेल मध्ये गाढी नदीच्या पाणी पातळीवर देखील लक्ष ठेऊन याबाबतची माहिती देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. कामोठे जुईनगर येथे उपायुक्त रविकिरण घोडके यांनी भेट दिली असून सदर ठिकाणची पाहाणी केली. तसेच त्यांनी एचओसी कॉलनी, आदिवासी वाडी येथे भेट देऊन येथे धूर फवारणीबाबत सूचना दिल्या. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

# शनिवारपासून पनवेलमध्ये दोन दिवस भजन पर्वणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शनिवार दिनांक २३ ऑगस्ट आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा' आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेसाठी पुरुष आणि महिला असे प्रत्येकी १५ भजन मंडळांची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पुरुष व महिला अशा दोन गटात हि स्पर्धा होणार असून या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी पुरुष गटातून ३६ तर महिला गटातून ३० भजन मंडळांनी सहभाग घेतला होता. त्यामधून पुरुष गटातील अंतिम फेरीसाठी श्री सद्गुरू वामनबाबा प्रासादिक भजन मंडळ सिद्धी करवले, श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघर, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वलप, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ गव्हाण, सुरताल भजन मंडळ नारंगी, जय श्री राधे गोविंद भक्ती समूह कामोठे, शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे, स्वरविहार भजन मंडळ अलिबाग, श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप, श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ म्हसळा, श्रीराम वरदायिनी भजनी मंडळ उलवे, श्री सिद्धेश्वर प्रासादिक संगीत भजन मंडळ आवास, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ वावंजे, गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेंधर, श्री गंगादेवी भजन मंडळ अलिबाग तर महिला गटात श्री पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ खारघर गाव, आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ ओवेपेठ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाजे, श्री सद्गुरू कृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली, कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे, सिद्धेश्वर प्रासादिक भजन मंडळ तळोजे मजकूर, श्री विश्वविजयनाथ सुहास्य संगीत विद्यालय उरण, ओमसाई भजन मंडळ खरसुंडी, नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा, शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ कर्जत, श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरुळ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली, राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ वावंजे, आणि ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ अशा प्रत्येकी १५ अशा एकूण ३० भजन मंडळांची निवड झाली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून शनिवारपासून पनवेलमध्ये दोन दिवस भजन पर्वणी मिळणार आहे.

# माथेरानला पावसाने झोडपले ; वर्षासहलीसाठी हौशी पर्यटक दाखल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सलग चार दिवसांपासून माथेरान मध्ये वरुणराजा मनसोक्तपणे पर्जन्यवृष्टी करत असल्याने या वर्षाऋतु मध्ये केवळ मनसोक्तपणे भिजण्याचा आनंद घेण्यासाठी हौशी पर्यटकांची गर्दी दिसत आहे. चार दिवस पावसाचे सातत्य असल्याने रस्ते धुवून चकाचक निघाले आहेत.तर काही ठिकाणी गटारांची सुयोग्य पध्दतीने साफसफाई न झाल्यामुळे गटारे तुंबलेली आहेत त्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहताना दिसत आहे. आपत्ती व्यवस्थापन चोख कामगिरी करत असून या पर्जन्यवृष्टी मुळे काही ठिकाणी झाडांची पडझड झालेली असून प्रशासन योग्य ती काळजी घेत आहेत. बाजारपेठा मध्ये काही प्रमाणात शुकशुकाट दिसत असून पॉईंट्स भागात निसर्गाचे नयनरम्य रूप न्याहाळण्यासाठी पर्यटक गर्दी करताना दिसत असून गरमागरम भजी,वडापाव,मका कणीस, चहाचा आस्वाद घेत आहेत. आबालवृद्ध पर्यटक हातरीक्षा मधून तर हौशी पर्यटक घोड्यावर बसून पॉईंट्स कडे सवारी करत आहेत.

माथेरानला दि. १९ऑगस्ट २०२५ पर्यंत हंगामी पर्जन्यमान एकूण ३८०९.२० मिमी. इतके झाले आहे. गेल्या वर्षी याच दिवशी, म्हणजेच १९ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण पर्जन्यनोंद ही ४४७२.६० मिमी. इतकी होती. म्हणजेच, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षीचा हंगामी पर्जन्यमानाची तफावत ही तब्बल ६६३.४० मिमी ने आजमितीस अजूनही कमी आहे. गेल्या वर्षी ३० सप्टेंबर रोजी एकूण हंगामी पर्जन्यमान ५९२७.० मिलिमीटर इतके झाले होते. आज दि.१९ रोजीच्या सकाळी साडेआठ वाजताच्या पर्जन्यमापन नोंदीनुसार, माथेरानला गेल्या २४ तासांत तब्बल २५४.६० मिलीमीटर इतकी पर्जन्यनोंद झाली.माथेरानला यावर्षीची २४ तासांतील सर्वोच्च पर्जन्यनोंद दिनांक १९ जून रोजी २६२ मिलीमीटर इतकी अगोदरच झाली आहे.



# म्हसळ्यात पावसाचे थैमान ; संपूर्ण तालुक्यात जनजिवन विस्कळीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस पडण्याची नोंद म्हसळा तालुक्यात होत असते.दोन दिवसांत ३५८ मी.मी.पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये दिनांक १७ रोजी १४३ मी.मी.तर दिनांक १८ रोजी सकाळी ८ ते पाच वाजेपर्यंत २१५ मी.मी.इतका पाऊस झाला असल्याचे सांगण्यात आले.

म्हसळा तालुक्यात आता पर्यंत एकुण ४०९५ मी.मी.पाऊस पडला आहे.मागील चार दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असल्याने तालुक्यात नदी नाल्यांचे पाण्याची पातळी वाढली आहे. पांगलोळी गावातील सखल भागात पावसाचे व नदी खाडीचे पाणी साचले असल्याने जाण्या येण्याचा मार्ग बंद झाला होता. पांगलोळी गावातील रहिवाशी मोहसीन अ.अझीझ धनसे यांच्या घराची पडवी कोसळून वित्त हानी झाली आहे तर लेप गावी एका घरासमोरील संरक्षण भिंत कोसळली आहे.मरियम खार येथील सचिन दौलत पारावे यांच्या घराची मागील भिंत कोसळली आहे. म्हसळा शहरात इम्तियात दळवी यांच्या घरावर विजेचा पोल पडुन घरातील वीज फिटिंग सह संपूर्ण इलेक्ट्रिक साहित्य जळून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. म्हसळा बायपास येथील ईदगा मैदानाची संरक्षण भिंतचे दोन ठिकाणी बांधकाम कोसळले आहे.

ढोरजे गाव मार्ग पुलावरून पाणी वाहत असल्याने येथील काही गावांचा येण्या जाण्याचा मार्ग बंद झाला होता. या मार्गावरून कोणी जावू नये अशी दवंडी पोलिस पाटील यांनी सोशल मीडियावर दिली होती. म्हसळा शहरातील दिघी रोड परिसर,तहसिल कार्यालय येथे गुडघाभर पाणी साचल्याने लोकांना रहदारी करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. दिनांक १८ ऑगस्ट रोजी सकाळी श्रीवर्धन आगारातून बोर्ली मार्गे मुंबई, बोरिवली, नालासोपारा, पुणे येथे जाणाऱ्या एस.टी. गाड्या खुजारे येथील राज्य मार्गावर पाणी साचल्याने प्रवासी वाहतूक ठप्प पडली होती. सायंकाळी उशिरा पर्यंत तालुक्यात किती प्रमाणात नुकसान झाले आहे याची माहिती म्हसळा महसूल विभागात नोंद झाली नसल्याचे सांगण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासन सज्ज झाले असून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी श्रीवर्धन मतदार संघात होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश तहसिल प्रशासनाला दिले आहेत.



# पुराचे पाण्याने वेढलेल्या खांदाड आदिवासी वाडीतील कुटुंबियांची केली सुरक्षित सुटका

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव मधिल खांदाड आदिवासीवाडी चारही बाजुने पुराचे पाण्याने घेरली अशात भयावह मुसळधार पडणारा पाऊस वाढती पाणी पातळी रात्रीची वेळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या वाडीवरील महिला, पुरुष, म्हातारी माणस, लहान मुलं जवळपास सत्तरऐंशी जणांची पुराचे धोकादायक वेढ्यातून सायं. ०५ ते मध्यरात्री ०३ वाजे पर्यंत जवळपास १० तास भरपावसात ट्युब तसेच रेस्क्यू बोट(होडी) व बॅटरीच्या प्रकाश झोतांचा वापर करीत पाण्यातून मार्ग काढीत अथक बचावकार्य पार पाडले.

या महत्त्वपूर्ण बचावकार्यात माणगांवचे मुख्याधिकारी संतोष माळी, प्रांताधिकारी डॉ.संदिपान सानप तसेच तहसीलदार दशरथ काळे यांच्या मार्गदर्शनात नगरपंचायतीचे सर्व बहाद्दर कर्मचारी प्रकाश मोरे, सारंग कनोजे, प्रमोद मोरे, सुनिल पारखे, नितीन चौरे, महेंद्र मोरे, मोहन जाधव, सुरेश मोरे, अल्पेश गायकवाड व माणगांवातील तरुण व पोलीस प्रशासनाने प्रसंगावधान राखीत आदिवासी कुटुंबियांस येथुन अथक बचाव कार्य करीत बाहेर काढून सुरक्षित माणगांव येथील जि.प. शाळेतील बचाव छावणीत आणून ठेवले.

आदिवासी बांधवाना येथुन सुरक्षित बाहेर काढताना बचावकार्य करणाऱ्यांना संभाव्य धोक्याची माहीती देत त्यांची खुप समजुत काढावी लागली. वाडी सोडून आम्ही कुठेच जाणार नाही अस सांगताना त्यांच्या बोली भाषेत मानी घर हा.. मानी सामान, कपडा-लत्ता, पोरा-बाला घरमा आहात! आमी हटुन जावुला नां! आमी हटच घरमा मरुला! याचा अर्थ आम्ही येथेच मरु अस बोलत वाडीतून निघण्यास ती तयार नव्हती. अखेर कशीबशी समजुत काढत सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यश आले.

अजुनही मुसळधार पाऊस काही थांबलेला नाही, पुराचे पाण्याच्या पातळीत अधुनमधुन वाढ होण्याचीच चिन्ह दिसत आहेत. तसेच हवामान खाते व प्रशासनाकडून रेड लर्ट जारी करण्यात आलेला आहे. आपात्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी स्थानिक प्रशासन व रेस्क्यू टीम तसेच कठीण प्रसंगी नेहमीच पुढे सरसावून मदतकार्यात हिरहिरिने हातभार लावणारी युवा मंडळी सतर्क झाली आहेत.



# महामार्गावर वाहन अपघातात सात जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील आदई गावाशेजारी पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावर प्रवासी बस आणि इरटीगा मोटारीत झालेल्या अपघातामध्ये सात प्रवासी जखमी झाले. बसथांबा नसताना सुद्धा प्रवासी वाहतूक करणारी बस येथे थांबविण्यात आल्याने हा अपघात झाला. पोलिसांनी या प्रकरणी बसचालकाविरोधात गुन्हा नोंदवला आहे. पूणे येथील मुंबईकडे जाणाऱ्या बसच्या चालकाने प्रवाशांना उतरविण्यासाठी भरधाव वेगात असलेली बस आदई गावाजवळील पुल ओलांडल्यानंतर लगेच महामार्गालगत उभी केली. पाऊस सुरू असल्याने या बस अचानक थांबल्याने या बसच्या पाठीमागून येणा-या मोटार चालकाने मोटारीचा ब्रेक मारला. मात्र पावसामुळे ब्रेक लागला नाही आणि मोटारीची मागून बसला धडक बसली. या अपघातामध्ये सातजण जखमी झाले. जखमींमध्ये दोन महिलांसह ११ वर्षांच्या मुलाचा समावेश आहे.

## मुरुडमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा शासकिय कार्यालयाला फटका

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या चार दिवसांपासून सर्वत्र जोरदार पाऊस पडत असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळित झाले आहे. मुरुडमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाने धुमाकूळ घातला असून शासकीय कार्यालय इमारतींना यंदाही प्लॅस्टिकचा आधार देऊनही गळतीचा फटका बसला आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून मुरुड मधील तहसीलदार, वनविभाग, कोषागार तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतींना गळतीवर उपाय प्लॅस्टिकचा वापर केला जातो आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे दहिवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत अशोक काना पाटील, दिलीप काना पाटील, मच्छिंद्र रामदास पाटील यांचे मालकीची व ताबे कब्जा वहिवाट असून सदरची शेतजमीन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे बोलणी करून निश्चित ठरले आहे.

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजेः- दहिवली, तालुका :- पनवेल, जिल्हा :- रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|
| ४८/३ | जिरायत ०-६३-००<br>पोटखराबा ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-६४-५० | ४.६२ |

तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत ईतर कोणीही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान बक्षिस, फरोक्तखत / खरेदीख, खरेदी, साठेक्रार, विकसन करार, कुळहक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, इजमेंट, लिज, लिन अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, अशा हरकतींमध्ये नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर किंवा प्रत्याक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांची मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिलांबरोबर सदर मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर व जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे

ठिकाण : पनवेल

दिनांक : १९/०८/२०२५

सही/-

**ॲड.साजीद एम. शेख**

**शॉप नं ४, समीर अपार्टमेंट, वाजी मोहल्ला, पनवेल ता. पनवेल जि. रायगड**

**मो.नं. ८४५०९२४९३४**



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे महोदर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे : महोदर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| उदय रामदास गोंधळी | १८८/२ | ०-३०-९०<br>पोटखराबा ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-३१-९० | ८.९४ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, कुळ हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : १९/०८/२०२५

सही/-

**ॲड.शेखर ज. खोपकर**

**९८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

**मो.नं. ८६५५१ ५८७८१**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोळखे, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक १) सुरेश नामदेव मुंढे, २) अनंता नामदेव मुंढे ३) विदया नामदेव मुंढे ४) लक्ष्मीबाई नामदेव मुंढे यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडुन कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहु मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापुर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक /भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : कोळखे, ता. पनवेल, जि. रायगड**

| खाते क्रमांक | भुधारण पद्धती | सर्व्हे नं. /गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| २३३ | २ | १३७ | २/ब | ००.०४.००<br>एकूण ००.०४.०० |

तरी वर नमुद जमीनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक १) सुरेश नामदेव मुंढे २) अनंता नामदेव मुंढे ३) विदया नामदेव मुंढे ४) लक्ष्मीबाई नामदेव मुंढे यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहित असल्याबाबत गृहित धरुन त्याप्रमाणे सदरहु मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमीनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडुन दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : १९/०८/२०२५

सही/-

**श्री.समाधान आ. काशीद**

**वकील उच्च न्यायालय**

**ऑफिस नं. १, तळ मजला, एकदंत को. ऑफ. सोसायटी, भुखंड क्रं. ९९, सेक्टर नं. २२, कामोठे, नवी मुंबई, ४१०२०९**

**मो. नं. ९०९६३९९०२०**



### जाहीर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल मे. वीर ब्रदर्स तर्फे प्रो. श्री. धमेंद्र नरपतलाल झवेरी रा. १८२/१८४, नागदेवी मार्ग, दुसरा माळा मुंबई ४००००३ यांनी भूखंड मालक श्री. अलिमुद्दीन एम शेख व श्रीमती रूमाना अलिमुद्दीन शेख दोघेही रा. वेअरहाउसिंग प्लॉट नं. ६०४, रोड नं. ०५, से नं. केडब्लुसी, कळंबोली नवी मुंबई ४१०२१८, यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीत आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भुखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहाऊसिंग प्लॉट | २२ | KWC | १७८६ | ४५०.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे.

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा-या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : १९/०८/२०२५

सही/-

**ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे**

**ॲडव्होकेट हायकोर्ट**

**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माणगांव कळमजे गोंद नदी वरील पुल काही काळ अवजड वाहनांसाठी बंद

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यात गेल्या तीन दिवसा पासून पावसाने हा हा कार केला असून माणगांव मधील काळ नदी तसेच कलमजे मधील गोंद नदी व इंदापूर मधील गोंद नद्यानी पाण्याची पातळी ओलांडली असून त्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत काळ नदीचे पाणी खादाड मध्ये तसेच माणगांव भारत रत्न डाँ.बाबासाहे आंबेडकर सांस्कृतिक भवन मध्ये घुसल्यानी या विहाराचे तसेच माणगांव मधील काही नागरिकांचे नुकसान झाले आहे.



तसेच कलमजे नदीवरी हा पुल दिडशे वर्षे जुना असून हा ब्रिटिशाने बाधलेला पुल आहे या पुला वरून रात्री पाणी जाऊ लागल्यामुळे हा पुल वाहतूकी साठी काही काळ बंद ठेवण्यात आला होता या वरून अवजड वाहनाना रात्री पासूनच नदी पात्रापासून काही अंतर दूरवर थांबविण्यात आले आहे. तसेच इंदापूर गोंद नदीचे देखील पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने नगरोळी रस्ता हा पाण्याखाली गेला असून नगोरोळी गांव, बौध्दवाडी, आदिवासी वाडी असे पाचशे ते सहाशे नागरिकांचा संपर्क तुटला आहे.तसेच याच गोद नदीचे पाणी इंदापूर पुणे जाणारा वाढवण रस्त्यावर आल्याने वाढवण, पाणसई,भिनाड,भाले या गावाचा संपर्क तुटला असून दळणवळण करण्यासाठी हा मार्ग संपूर्णपणे बंद आहेत

तसेच माणगांव काळ नदी तसेच गोंद नदी यांची पाहणी करताना शिवसेनेचे युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे यांनी बोलताना सांगितले की ज्याप्रमाणे महाड येथील सावित्री नदीचा गाळ काढल्यामुळे महाडकरांना पुराच्या पाण्या पासून दिलासा मिळाला त्याचप्रमाणे माणगांव तालुक्यातील काळ नदी व गोद नदी या नद्यांचा गाळ काढण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मंत्री नामदार भरतशेठ गोगावले साहेब यांच्या माध्यमातून आम्ही शासनाकडे करणार आहोत. माणगांव शहरामध्ये मध्ये तसेच महामार्गावर आलेले पुराचे पाणी ही धोक्याची घंटा असून भविष्यात माणगांववासियांना महापुराचा फटका बसू नये यासाठी प्रमुख नद्यांमधील गाळ काढणे आवश्यक आसल्याचे त्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल हिना हरिश दोषी रा. बद्रिका आश्रम, रूम नं. १९०, तिसरा मजला, खेतवाडी, पहिले व दुसरा लेण, नानुबाई देसाई रोड, गिरगाव मुंबई ४००००४ यांनी भूखंड मालक श्री. मे. शाह छगनलाल लाधूभाई तर्फे पार्टनर श्री. चंद्रकांत सी. शाह रा. ऑफिस १९२, संत तुकाराम रोड, मुंबई ४०००९, यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीत आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भुखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहाऊसिंग प्लॉट | १० | KWC | ९२१ | २५०.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे.

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा-या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०८/२०२५

सही/-
**ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**



## जाहीर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल श्रीमती शिल्पा गंगाराम नारायणकर रा. अमरांटे, रूम नं. ७०१, फेज २, बिल्डींग नं. १९, प्लॉट नं. ४. से. ९ ई, कळंबोली, ४१०२१८ व रूपाली भगवान भोपी रा. ९/३०३, अमरंटे, निसिध्दी, डीमार्ट समोर, से. ९, कळंबोली ४१०२१८ यांनी भूखंड मालक श्री. प्रतिभा सतिश शाह, रा. १४०२, ओ विंग क्लब ॲकवारिया, देविदास लेण, टॉवर/ओ, बोरिवली वेस्ट, गाव एक्सार, मुंबई ४००१०३, यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीतः आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भुखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहाऊसिंग प्लॉट | १ | KWC | १४० | १२५.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे.

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा-या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दसरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०८/२०२५

सही/-
**ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**



(मा. जागुष्टे यांचे कोर्टात)
अर्जदारातर्फे वकील ॲड डि. पी. घरत

## जाहीर नोटीस

मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०८८/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०९/२०२५

श्रीमती संगिता विनायक मायदे व इतर — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, कै. विनायक तुकाराम मायदे हे दिनांक २७/०१/२०१३ रोजी मौजे नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. कै. विनायक तुकाराम मायदे यांचे पश्चात त्यांना पत्नी अर्जदार क्र. १ श्रीमती संगिता विनायक मायदे वय-५४ वर्षे, धंदा-गृहीणी, राहणार-नांदगाव, पळस्पे, रायगड ४१०२२१, विवाहीत मुलगा, अर्जदार क्र. २ श्री. प्रथमेश विनायक मायदे वय-२८ वर्षे, धंदा-शेती राहणार-नांदगाव, पो पळस्पे, ता.पनवेल, जि रायगड, ४१०२२१ विवाहीत मुलगी विवाहीत मुलगी अर्जदार क्र. ३. सौ संस्कृती रूपेश म्हात्रे वय-२३वर्षे, धंदा-गृहीणी राहणार-रूम नं १०१, कृष्णा कॉम्पलेक्स, प्लॉट नंबर ३७, सेक्टर १६, कामोठे, रायगड, ४१०२०९, आई अर्जदार क्र. ४. श्रीमती. कांताबाई तुकाराम मायदे वय-७९ वर्षे, धंदा-गृहीणी राहणार-मु नांदगाव, पो पळस्पे, रायगड-४१०२२१ हे कायदेशिर वारसदार आहेत.

अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. विनायक तुकाराम मायदे यांचे कायदेशिर वारसदार असल्याचा में कोर्टात वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणी ही कै. विनायक तुकाराम भायदे यांना वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांना देण्या सबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही लेखी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात वरील प्रमाणे मुदतीत हरकती दाखल केल्या नाहीत तर अर्जाचे कामी योग्य ती पुर्तता करून में कोर्ट अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करेल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०८/२०२५ रोजी माझे सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**



प्रो.जमा २-२५ — अर्जदाराचे वकील ॲड.उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब 'व' स्तर यांचे कोर्टात
प्रोबेट अर्ज क्र.७१८/२०२५
ने.ता.२७/१०/२०२५

श्री.पुष्कर प्रफुल्ल रामकृष्ण तेरडे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाले

ज्या अर्थी कै. प्रफुल्ल रामकृष्ण तेरडे हे दिनांक ०९.०२.२०२५ रोजी यांच्या राहत्या घरी से १०३ पृथ्वी हाईटस, सेक्टर नं. १९ , प्लॉट नं. १९०, उलवे, नवी मुंबई येथे मयत झाले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

१) मौजे-उलवे, नवी मुंबई, ता. पनवेल जि. रायगड येथील
सदनिका- सदनिका नं. : अे/ २०३
पृथ्वी हाईटस, दुसरा मजला,
प्लॉट नं.: १९०, सेक्टर नं.: १९

२) मौजे-उलवे, नवी मुंबई, ता. पनवेल जि. रायगड येथील
गाळा- शॉप नं. : १, जैनम रत्ना
तळमजला, प्लॉट नं.: ६२, सेक्टर नं.: २१

३) मौजे : चिखली भोम वा उरण जि. रायगड येथील
शेतजमीन मिळकत

| अ.नं. | मौजे | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिखली भोम ता.उरण | १५ | ३/अ/१ | ००.४१.०० पो.ख.००.१०.०० एकूण ०१.५१.०० पैकी ००.२६.०० हे.आर.चौ.मी. | ३.४१ |

कै. प्रफुल्ल रामकृष्ण तेरडे यांचे मृत्युपश्यात वरील मिळकती अर्जदार यांना मृत्युपत्रा प्रमाणे देण्याचे लिहिलेले आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा मृत्युपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा मृत्युपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट देण्यासाठी अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस मृत्युपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने 'सार्वजनिक गणेशोत्सव सन २०२४' मधील उत्कृष्ट गणेश मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार वितरण समारंभ पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पनवेल, प्रशांत मोहिते हे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथींमध्ये सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, भाऊसाहेब ढोले, सहा पोलीस आयुक्त विक्रम कदम, वपोनि नितीन ठाकरे, वपोनि गजानन घाडगे, जयंत पगडे, अजय बहिरा यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमात उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम क्रमांक श्री गणेश उत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक,उरण तर द्वितीय क्रमांक श्री गणेश मित्र मंडळ, सेक्टर ३४, कामोठे यांनी पटकावला. उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम गटात प्रथम क्रमांक शंभो मित्रमंडळ, सेक्टर ३५, कामोठे, व्दितीय क्रमांक गणेश मित्र मंडळ, सेक्टर १८, खारघर, शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूक गटात प्रथम क्रमांक जय दुर्गा क्रीडा व ग्रामविकास तरुण मंडळ, रोहिंजण, तळोजा तर द्वितीय क्रमांक अभिनव युवक मित्र मंडळ, पायोनियर विभाग, पनवेल यांनी पटकावला, उत्कृष्ट देखावा या गटात प्रथम क्रमांक राजे शिवाजीनगर रहिवाशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळंबोली. द्वितीय क्रमांक एकविरा मित्र मंडळ, तक्का, पनवेल, सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ गटात प्रथम क्रमांक जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रिटघर, तर द्वितीय क्रमांक अनमोल जीवन वेलफेअर असोसिएशन, उलवे यांनी पटकावला त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी पनवेल कोळीवाडा येथे विसर्जनासाठी मदत करणाऱ्या स्वयंसेवकांचा आणि परीक्षक मंडळाचा सत्कार करण्यात आला.

तसेच यावेळी ॲड. सुरेश बोंद्रे, खांदा कॉलनी, दत्तात्रय सुळेभाविकर, शामल आंग्रे, कविता ठाकुर, ॲड. श्रीमती संतोषी चव्हाण, आणि ॲड. सतिश देशमुख या परीक्षक मंडळांचा देखील सत्कार करण्यात आला.




## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल (१) श्री. राहुल शंकर पाटे (२) श्रीमती. सुजाता राहुल पाटे राहणार : सी -५/६-१/३, ग्रीन लँड अपार्टमेंट, सेक्टर ३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४, यांची खालील वर्णनाची मिळकत स्वताच्या मालकिची आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

Flat No - - 303, in the Co-operative Housing Society known as MARUTI NIWAS, admeasuring total area of 584 Sq.Ft. i.e. 54.25 Sq.Mtrs. Carpet Area, on Plot No. B-37, at Sector No. 06, New Panvel (E), Tal. Panvel, Dist. Raigad 410206.

त्यानंतर वरील मिळकतीचे मुळ कागद पत्रे आमच्या अशिलांच्या ताब्यात होते. आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत. सदर मिळकतीचे खालील कागदपत्रे आमचे अशिल यांच्या कडुन गहाळ झाले आहेत. (1) Original Share Certificate no. 011, five fully paid-up shares bearing distinctive serial numbers from serial no. 51 to serial no. 55, both inclusive of the face value of Rs.50/- (Rupees Fifty each) i.e. Rs.250/- (Rupees Two Hundred Fifty Only) issued by MARUTI NIWAS Co-operative Housing Society.

त्याबाबत आमच्या अशिलांनी खांदेशवर पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचा नं. ooSiWgPPzl दि. १०/०८/२०२५ असा आहे.

तरी याबाबत कोणाही व्यक्तीस कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रा सहित १४ दिवसाच्या आत समक्ष भेटावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०८/२०२५

सही/-
**ॲड. यश प्रभाकर बांगर**
**शॉप क्र. ०४, समनवय को. ऑप. सो, प्लॉट क्र.१३, सेक्टर क्र.११, खारघर -४१०२१०**
**मो.नं. ८८९८६५१६४४/८९२८५५६४०१**



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्रं.अपिल/डेस्क/आरटीएस/रिस्टो/५६४/२०२५ दि. २३/०६/२०२५

प्रती,

## जाहिर सूचना

१. श्री. आत्माराम पदु पाटील
रा. तळोजे, मजकुर, पो. तळोजे,
ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार
विरूध्द
१. श्री. दिलीप चंद्रकांत पाटील (मयत तर्फे वारस)
१/१ श्रीमती शकुंतला दिलीप पाटील
१/२ श्री. सचिन दिलीप पाटील
१/३ श्री. राजेश दिलीप पाटील
२. श्री. अरुण चंद्रकांत पाटील
३. श्री. रतन चंद्रकांत पाटील
४. श्री. विश्वास चंद्रकांत पाटील
५. श्री. सुभाष चंद्रकांत पाटील
सर्व रा. तळोजे, मजकुर, पो. तळोजे,
ता. पनवेल, जि. रायगड
६. श्रीमती सुलोचना भगवान म्हात्रे
मु. बोनकडे, कोपरखैरणे, नवी मुंबई
७. श्रीमती नंदिनी सुदाम पाटील
८. श्रीमती सुनिता जनार्दन पाटील
दोघे रा. मु. करवले, पो. तळोजे
ता. पनवेल, जि. रायगड
९. श्रीमती निता निवृत्ती चौधरी
रा. कटाई, ता. कल्याण, जि. रायगड
१०. श्रीमती विजया जनार्दन पाटील
रा. तळोजे, मजकुर, पो. तळोजे, ता. पनवेल, जि. रायगड
११. श्रीमती गुणाबाई चंद्रकांत पाटील (मयत)
अपेलंट क्र.१ ते १० स्वतः करीता व
अपेलंट क्र.११ हिचे वारस म्हणुन
मा. अपर जिल्हाधिकारी रायगड — सामनेवाले

विषयः- अपर जिल्हाधिकारी, अलिबाग, रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद/अपिल क्र.३६५/२०१७ दि.३१/०३/२०२३ चे विरुध्द फेरतपासणी अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १६.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता**


# पनवेलमध्ये १३५ नागरिकांचे स्थलांतर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सततच्या मुसळधार पावसामुळे नवीन पनवेल येथे बांठिया विद्यालयासमोरील रस्ता, करंजाडे वसाहतीमधील पुनर्वसितांच्या आर. १ व २ तसेच पनवेल येथील पटेलमोहल्ला व कच्छी मोहल्ला येथील १३५ जणांना पालिकेच्या शाळांमध्ये सुखरुप स्थलांतरित करण्यात आले आहे .

कळंबोली वसाहतींच्या काही सखल भागात सततच्या पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले होते. यासह कळंबोली सर्कल येथे काम सुरू असल्याने सर्कलच्या परिसरात पाणी काढण्यासाठी जेसीबीच्या खोऱ्याचा वापर प्रशासनाला करावा लागला. रात्री पुन्हा आठ वाजता उंच भरतीचा इशारा असल्याने रात्री आपत्तीसाठी पालिका आयुक्तांनी सूमारे ३५० नागरिकांच्या निवाऱ्यासह खाद्यपदार्थांची सोय करण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला दिले होते.


मे. खंडारे सो हयांचे न्यायालयात
अर्जदारांचे वकील : ॲड. अतुल सुनिल जोशी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९६३/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०९/२०२५

१) श्री. शंतनु कृष्णाजी पटवर्धन
वय वर्षे ६९ व्यवसाय निवृत्त
रा. बी ३०१ यशोक्रिष्णा सोसायटी
शिवाजी रोड, विरूपाक्ष मंदिराजवळ, पनवेल ४१०२०६
२) सौ. सुनिता मिलिंद जोशी
वय ५९ वर्षे व्यवसाय धंदा
रा. ४ अर्जुन निवास, सुदाम वाडी, आयरे रोड,
स्वामी विवेकानंद शाळेजवळ डोंबिवली ४२१२०१
३) श्रीमती शिला सुधाकर पटवर्धन
वय ८१ वर्षे व्यवसाय निवृत्त
रा. फ्लॅट नं १०२, आशा पुजा सोसायटी,
हर्डीकर हॉस्पिटल जवळ, रामचंद्रनगर डोंबिवली ४२१२०१
४) श्री. शेखर सुधाकर पटवर्धन
वय ४८ वर्षे व्यवसाय सनदी लेखापाल
रा. फ्लॅट नं १०२, आशा पुजा सोसायटी,
हर्डीकर हॉस्पिटल जवळ, रामचंद्रनगर डोंबिवली ४२१२०१
५) सौ. क्षिप्रा अभिजित टकले
वय ४८ वर्षे व्यवसाय नोकरी
रा. १०३ देवश्री फ्लॅट नं. ३ बिबवेवाडी
महेश सोसायटी हवेली अ पुणे ४११०३७
६) श्री. अमरेश सतिश टिळक
वय ४४ वर्षे व्यवसाय नोकरी
रा. १०१ सुविंद सोसायटी, पारनाका,
सिध्देश्वर लेन कल्याण पश्चिम ४२१३०१
७) सौ. ऋजुता योगेश जोशी
वय ३९ वर्षे व्यवसाय वकील
रा. बी ६०६ ओम श्रीकृष्ण अपार्टमेट, आधारवाडी चौक,
हनुमान मंदिरासमोर कल्याण पश्चिम ४२१३०१ — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटिशीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. निर्मला उर्फ निर्मलाबाई कृष्ण (क्रिष्णाजी) जोशी यांचे दि. ०९/०७/२०१२ रोजी देहावसान झाले असून त्यांचा मृत्युसमयीच्या वास्तव्याचा पत्ता बी ३५ त्रिवेणी धारा, सोसायटी, आधारवाडी, कल्याण असा आहे. वर नमुद अर्जदार क्र. १ ते ७ हयांनी मयताच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : लोधीवली, ता. खालापूर, जि. रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | ८४ अ/२० | ०.१९.५० | ०.१४ |
| २ | ८४ अ/१८ | ०.०३.०० | ०.०३ |
| ३ | ४/७ | ०.०६.०० | ०.०० |
| ४ | ५७/३ | ०.०६.०० | ०.११ |

वर नमुद अर्जदार हे कै. निर्मला उर्फ निर्मलाबाई कृष्ण (क्रिष्णाजी) जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय अर्जदार क्र. १ ते ७ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. निर्मला उर्फ निर्मलाबाई कृष्ण (क्रिष्णाजी) जोशी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हा वारसदाखला मंजूर करेल.

आज दिंनाक / /२०२५ रोजी माझ्या सहीनशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# अतिवृष्टीमुळे उरण मधील घरांची पडझड, रस्ते पाण्याखाली, झाडे उन्मळून पडली



**दै.रायगड नगरी । उरण**

मागील तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसाचा तडाखा उरण तालुक्याला बसला असून रहिवाशांच्या घरांची पडझड झाली आहे.रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहन चालक बेजार झाले आहेत.झाडे उन्मळून पडली असून जागतिक कीर्तीच्या जेएनपीए बंदराची व परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी नेहमी मेहनत घेणाऱ्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या इमारतीत पावसाचे पाणी शिरल्याची घटना घडली आहे. यामुळे पोलीसांना कामकाज करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उरण तालुक्याला पावसाने झोडपून काढले असून मागील तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे रानसई, मोठी जुई, पिरकोन, चाणजे, जासई, सारडे, कोप्रोली, चिरनेर या ग्रामपंचायत हद्दीत रहिवाशांची कौलारू घर पडल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत जीवीतहानी झाली नसली तरी रहिवाशांचे आर्थिक नुकसान झाले असून उरण महसूल विभागाच्या माध्यमातून सदर नुकसानी संदर्भात पंचनामे करण्याचे काम सुरू असल्याची माहिती उरण तहसील कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे.उरण जेएनपीए बंदराला जोडणारे नवीमुंबई , पनवेल शहराकडील रस्ते पाण्याखाली गेल्याने व झाडे उन्मळून पडल्याने वाहन चालक प्रवाशी नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे.तसेच जागतिक कीर्तीच्या जेएनपीए बंदराची व परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी नेहमी मेहनत घेणाऱ्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या इमारतीत पावसाचे पाणी शिरल्याची घटना घडली आहे. यामुळे पोलीसांना कामकाज करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अतिवृष्टीचा तडाखा उरण तालुक्याला बसत असताना आपत्कालीन व्यवस्थापन अधिकारी किंवा ठिक ठिकाणचे ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी,तलाठी,मंडळ अधिकारी, कृषि विभागाचे अधिकारी तसेच इतर शासकीय अधिकारी वर्ग आप आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त केली जात आहे.

# पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी त्याबाबतचे आदेश जारी केले आहेत. नवीन बदली आदेशानुसार नवी मुंबई आयुक्तालयातील दहा पोलीस निरीक्षकांची अदलाबदल करण्यात आली आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना नेमणुकीच्या ठिकाणी तत्काळ हजर राहण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

या बदली आदेशामध्ये पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांची गुन्हे शाखेतून कोपरखैरणे पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांची गुन्हे शाखेतून उरण पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी तसेच पोलीस निरीक्षक संजय पाटील यांची वाहतूक शाखेतून वाशी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी, सीबीडी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक अरुण पवार यांची सीबीडी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी, पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांची वाहतूक शाखेतून न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी, कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांची वाहतूक शाखेत, तसेच वाशी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांची विशेष शाखेत, सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदेश रेवले यांची सुरक्षा शाखेत, एनआरआय पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील कदम यांची वाहतूक शाखेत, तर पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांची विशेष शाखेतून गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. याशिवाय, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हे मुंबई शहर पोलीस आयुक्तालयातून नुकतेच नवी मुंबई आयुक्तालयाच्या आस्थापनेवर बदलीने दाखल झाले असून त्यांची एनआरआय पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ (१) व (२) मधील सुधारित स्पष्टीकरणानुसार पोलीस आयुक्त स्तरावरील आस्थापना मंडळाच्या अधिकारान्वये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेत प्रशासनिक निकड आणि जनहिताचा विचार करून या पोलीस निरीक्षकांच्या बदल्या व नवीन पदस्थापना करण्यात आल्या असल्याचे सांगण्यात आले.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्याचे बेमुदत कामबंद आंदोलन




**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सरकारी सेवेतील समावेशासह विविध मागण्या साठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील ६०० हुन अधिक अधिकारी व कर्मचारी ह्यांनी १९ तारखेपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे सरकारी रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेसह अतिदक्षता विभाग , लसीकरण औषध वितरण यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या डायलेसिस आणि नवजात कक्ष हे दोन विभागातील अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत परंतु दोन दिवसात शासनाकडून निर्णय न झाल्यास त्या विभागातील कर्मचारी बेमुदत आंदोलनातं सहभागी होणार आहेत अशी माहिती राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती चे रायगड चे अध्यक्ष विकास धुमाळ ह्यांनी दिली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती अंतर्गत विविध आरोग्य कामगार संघटना प्रथमच यामध्ये सक्रिय झाल्या आहेत. यामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग असल्याने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होणार आहे. हे सर्व सरकारी रुग्णालयात आरोग्य विभागाच्या नियमित सेवेत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतात. परंतु त्यांना पगार कमी मिळतो १० वर्षापेक्षा अधिककाळ सेवेत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ७० संवर्ग आहेत. शासनाच्या २०२४ मध्ये सहसा निर्णय जारी करून त्यांना सरकारी सेवेत संयोजन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यापैकी केवळ चतुर्थ श्रेणीतील आणि चालक ह्यांचेच समायोजन झाले उर्वरितांच्या तोंडाला पाने पुसली.

२०२२ मध्ये समायोजनाचा आदेश उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिले होते त्यावर ३० टक्के मंजूर पदावर समायोजनाचा निर्णय घेण्यात आला पण दीड वर्ष झाले तरी हा निर्णय आमलात आणला नाही त्यासह १५ टक्के मानधन वाढ तात्काळ लागू करणे, बदली धोरण भविष्य निर्वाह निधी व विमा योजना सेवेत असताना मृत्यू झाल्यास ५० लाख, व अपंगांत्व आल्यास २५ लाख सानुग्रह अनुदान आदी १८ मागण्या मान्य कराव्यात अशी आंदोलकांची मागणी केली आहे.

या पूर्वी ८ जुलै रोजी रोजी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत आश्वासन देण्यात आले होते मात्र आद्यपही त्याची पूर्तता न झाल्याने अखेर बेमुदत संप करावा लागला असल्याचे विकास धुमाळ ह्यांनी सांगितले.

# मुंबई गोवा महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण व पुरस्कार वितरण

## कल्पेश ठाकूर यांच्या साई सहारा प्रतिष्ठानचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई गोवा महामार्ग व रायगड जिल्ह्यात होणारी गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनांची इत्यंभूत माहिती मिळण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरील साई सहारा रेस्टॉरंट समोर ANPR या अत्याधुनिक पद्धतीचे कॅमेरे बसविले असून त्याचे उदघाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, प्रांताधिकारी प्रवीण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, तहसीलदार तानाजी शेजाळ, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, दादर पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे साई सहारा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कल्पेश शरद ठाकूर यांच्या हस्ते झाले.

सदर सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रातील हेल्प फाउंडेशन खोपोली, अहिल्या सामाजिक संस्था पेण, वाईल्डर कोलाड, संपर्क बालग्राम पोयनाड, व सिस्केप संस्था महाड या संस्थेतील पदाधिकाऱ्यांचा येथे सत्कार करण्यात आला.

मुंबई गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांचे मदतगार देवदूत कल्पेश ठाकूर हे दिवस असो वा रात्र असो नेहमीच अपघातग्रस्तांना स्वतःच्या रुग्णवाहिकेतून मदत करत असतात

तसेच आपत्कालीन परिस्थिती सुद्धा लोकसेवा करत असतात.

आता गुन्ह्यात वापरलेल्या वाहनांची इत्यंभूत माहिती पोलिसांना मिळण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरील साई सहारा रेस्टॉरंट समोर ANPR या अत्याधुनिक पद्धतीचे कॅमेरे बसविण्याचा नवीन उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. असे उदगार प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांनी येथे सांगितले.



# महानगरपालिकेच्यावतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरे करण्यासाठी शाळांमधून शॉर्ट फिल्मचे प्रसारण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्यवतीने दरवर्षीप्रमाणे 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' ही संकल्पना घेऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. या अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमधून नुकतेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरे करण्याच्या दृष्टीने शॉर्ट फिल्मचे प्रसारण करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्साहाला पर्यावरण रक्षणाची जोड देण्याच्या दृष्टीने मागील वर्षी महानगरपालिकेच्यावतीने शॉर्ट फिल्म तयार करण्यात आली होती. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार गणेश मुर्ती कार्यशाळांबरोबरच या शॉर्ट फिल्मचे प्रसारण विविध शाळांमध्ये करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नुकतेच अराईज ग्लोबल स्कल, अजंता इंटरनॅशल स्कूल, इलाईट पब्लिक स्कूल, गोखले स्कूल खारघर, जिल्हा परिषद शाळा मुर्बी, जिल्हा परिषद शाळा कोपरा गाव या विविध शाळांमध्ये शॉर्ट फिल्मचे प्रसारण करण्यात आले.

# पालीतील रस्त्यांवर खड्ड्यांचा विळखा

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाली शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तर्फे शहर प्रमुख विद्देश आचार्य यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले आहे.२९ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत पाली व खेडोपाड्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. श्री बल्लाळेश्वर मंदिरातही देशभरातून भाविक मोठ्या संख्येने येणार असल्याने शहरातील रस्त्यांची दुरवस्था चिंतेचा विषय ठरत आहे. पोलिस स्टेशन ते गणपती मंदिर, हटाळेश्वर चौक, विक्रम स्टँड तसेच पालीतील प्रमुख रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, या खड्ड्यांमुळे गणेश मूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असून पावसामुळे खड्डे खोल होऊन गंभीर अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे.

# संस्काराचा वारसा सातत्याने पुढे चालत राहावा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्याच्या पिढीवर योग्य संस्कार करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असून हा संस्काराचा वारसा सातत्याने पुढे चालत राहावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी विचुंबे येथे छत्रीवाटप आणि निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात केले.

भारतीय जनता पक्ष विचुंबेच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विचुंबे, देवद आणि उसर्ली वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून नुकतीच निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ तसेच ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटपाचा कार्यक्रम सोमवारी (दि. १८) रायगड जिल्हा परिषदेच्या विचुंबे येथील शाळेत झाला.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, देवदचे सरपंच विनोद वाघमारे, गावाध्यक्ष के.सी. पाटील, माजी सरपंच बळीराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य आरती गायकवाड, श्रावणी भोईर, विभूते सुरते, प्रगती गोंधळी, अनंता गायकवाड, व्ही. डी. पाटील, माई म्हात्रे, अक्षदा गायकवाड, भाग्यश्री भोईर, हर्षदा भिंगारकर, नीलम भिंगारकर, ज्योती भोईर, माजी उपसरपंच किशोर सुरते, अविनाश गायकवाड, रवींद्र भोईर, जगदीश भोईर, डी.के.भोईर, संजीत भिंगारकर, गुरूनाथ म्हात्रे, हनुमान भोईर, गुड्डू भोईर, अनिकेत गायकवाड, सुरज सुरते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप करण्यात आले.

# कु.संस्कृती सुतार हिला रायगड जिल्हा मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक

**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

रोहा मध्ये १७ ऑगस्ट २०२५ रोजी रायगड जिल्हा मिक्स बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय स्पर्धेसाठीचे राज्य निवड चाचणी पार पडली. या स्पर्धेचे आयोजन रोहा तालुका मिक्स बॉक्सिंग असोसिएशन यांनी केले होते. या स्पर्धेत माणगाव तालुक्यातील पळसगाव खुर्द येथील कु. संस्कृती संतोष सुतार हिला सुवर्णपदक मिळाले. कु. संस्कृती ही इयत्ता पाचवी ची विद्यार्थिनी असून ती आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल (जंगम स्कूल) येथे शिक्षण घेत आहे.

रायगड जिल्हा मधील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त फायदा व्हावा, येणाऱ्या शालेय स्पर्धेत त्यांनी अधिकाधिक पदके मिळवावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

यामध्ये रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील १०० विद्यार्थ्यांमध्ये ही स्पर्धा पार पडली. या विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास प्रशस्तीपत्र व मेडल देण्यात आले. यात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड रायगड जिल्ह्याकडून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली.

यात प्रमुख पाहुणे मिक्स बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांचे सचिव सचिन शिंगोटे सर तसेच महाराष्ट्र मिक्स बॉक्सिंग अध्यक्ष श्रीमती कोमलताई शिंदे मॅडम, रायगड जिल्हा अध्यक्ष वृषल गोवर्धने सर व महाराष्ट्र टीम कोच राकेश पाटील सर हे सर्व मंडळी उपस्थित होते. आयोजक रोहा तालुका अध्यक्ष ओमकार हजारे सर यांच्या नियोजनात हि स्पर्धा उत्तमरीत्या पार पाडली.

या स्पर्धेमध्ये माणगाव तालुक्यामधून बरेच स्पर्धक गेले होते. त्यातील काही स्पर्धाकांना गोल्ड मेडल, सिल्वर मेडल प्राप्त झाले. संस्कृती सुतार हिच्यासह ईशा नवले, ओवी कदम, रश्मी पालकर, नीरज पालकर यांनी गोल्ड मेडल पटकावले. दक्ष गोसावी, वंदीत म्हात्रे यांनी सिल्वर मेडल पटकावले. त्यांना त्यांचे प्रशिक्षक वैष्णवी विलास चव्हाण मॅडम, माणगाव तालुका मिक्स बॉक्सिंग अससोसिएशनचे अध्यक्ष विशाल विजयकुमार दळवे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## मराठा संघर्षासाठी ऐतिहासिक हाक

# २९ ऑगस्ट रोजी आझाद मैदान येथे आमरण उपोषणात सहभागी होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण करणार आहेत.या पार्श्वभूमीवर आज सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्या वतीने मराठा भवन कार्यालय, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे बैठक पार पडली.

या बैठकीत समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकमुखी निर्णय घेतला की, मुंबईत होणाऱ्या या आंदोलनात सकल मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच महाराष्ट्रभरातून येणाऱ्या आपल्या बांधवांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेत त्यांच्या अन्न, पाणी व निवासाची सोय करून समाजसेवेचे कार्य पार पाडत मराठा समाजाची ताकद दाखवायची . यावेळी मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते .